सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग,शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-०१२६/ प्र .क्र. १८ / विशा - ३ (अ) दि.०९/०९/२०२६

**विषय:-** गुंगीकारक द्रव्ये व मनावर परिणाम करणा-या पदार्थाच्या अनुचित व्यापारास प्रतिबंध अधिनियम, १९८८ अन्वये प्रस्तावाची छाननी करण्याकरीता गठीत केलेली छाननी समिती (Screening Committee) रद्द करणेबाबत

s *****

महाराष्ट्र शासन,गृह विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- ०१२६ / प्र. क्र .१८/ विशा - ३, (अ) दि.०९/०९/२०२६, ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०९०९१८४९००६८२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Anita Pitambar Rathod
Date: 24-09-2026
16:37:28

( अनिता राठोड )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह)
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथक फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण,माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/

नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), (नियोजन व समन्वय) महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**गुंगीकारक द्रव्ये व मनावर परिणाम करणाऱ्या पदार्थाच्या अनुचित व्यापारास प्रतिबंध अधिनियम, १९८८ अन्वये प्रस्तावाची छाननी करण्याकरीता गठीत केलेली छाननी समिती (Screening Committee) रद्द करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-०१२६/प्र.क्र.१८/विशा-३(अ)**
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: ०९ सप्टेंबर, २०२६

**संदर्भ :-**

१. भारत सरकार, पत्र (गुप्त) क्र.७७१/५/८८/Cus/VIII/Q, दि.०४.०७.१९८८

२. शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक: SPL ३(A)/PND-१०८८-II, दि.०३.०८.१९८८

३. समक्रमांकाची शासन अधिसुचना, दि.०४.०९.२०२६ व दि.०७.०९.२०२६

**प्रस्तावना :-**

अंमली औषधी द्रव्ये आणि मनावर परिणाम करणाऱ्या पदार्थांच्या अवैध व्यापारास आळा घालण्यासाठी उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील अध्यादेशानुसार भारत सरकारने स्थानबद्धतेसाठी प्रायोजक प्राधिकरणांकडून (Sponsoring Authorities) प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची छाननी करण्याकरीता “छाननी समिती” गठीत करण्याबाबत सूचना दिली होती.

त्यानुषंगाने, उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये राज्यात गुंगीकारक द्रव्ये व मनावर परिणाम करणाऱ्या पदार्थाच्या अनुचित व्यापारास प्रतिबंध अधिनियम, १९८८ (PITNDPS Act, १९८८) अंतर्गत स्थानबद्धतेचे प्रस्ताव छाननी करण्यासाठी संचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या अध्यक्षतेखाली छाननी समिती (Screening Committee) गठीत करण्यात आली होती.

सद्यस्थितीत उपरोक्त संदर्भ क्र.३ येथील अधिसुचनान्वये गुंगीकारक द्रव्ये व मनावर परिणाम करणाऱ्या पदार्थाच्या अनुचित व्यापारास प्रतिबंध अधिनियम, १९८८ (The Prevention of Illicit Traffic in Narcotic Drugs and Psychotropic Substances Act, १९८८) च्या कलम ३ अंतर्गत

आयुक्तालय स्तरावरील पोलीस आयुक्तांना (IG Rank & above) आणि रेंज स्तरावरील पोलीस महानिरीक्षकांना स्थानबद्ध प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

सबब, उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेली छाननी समिती रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये गुंगीकारक द्रव्ये व मनावर परिणाम करणाऱ्या पदार्थाच्या अनुचित व्यापारास प्रतिबंध अधिनियम, १९८८ (PITNDPS Act, १९८८) अन्वये प्रस्तावाची छाननी करण्यासाठी संचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठीत छाननी समिती (Screening Committee) या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात येत आहे.

१. गुंगीकारक द्रव्ये व मनावर परिणाम करणाऱ्या पदार्थाच्या अनुचित व्यापारास प्रतिबंध अधिनियम, १९८८ (PITNDPS Act, १९८८) अन्वये स्थानबद्धतेच्या प्रकरणाबाबत सुधारीत कार्यपद्धती खालीलप्रमाणे राहील.

I. सर्व पोलीस घटक (Sponsoring Authority) यांनी स्थानबद्धतेचे परिपूर्ण प्रस्ताव उपरोक्त संदर्भ क्र.३ अन्वये घोषित करण्यात आलेल्या स्थानबद्धता प्राधिकारी (Detaining Authority) यांच्याकडे थेट सादर करावेत.

II. स्थानबद्धता प्राधिकारी यांनी प्राप्त प्रस्तावातील कागदपत्रे व पुराव्यांची काटेकोर तपासणी करून शक्य तितक्या लवकर PITNDPS Act, १९८८ च्या कलम ३ नुसार योग्य ते आदेश (Order) निर्गमित करावे.

III. स्थानबद्धता प्राधिकारी यांनी स्थानबद्धतेचा आदेश निर्गमित केल्यानंतर स्थानबद्धतेचे आदेश (Detention Order),स्थानबद्धतेची कारणे (Grounds of Detention) व संबंधीत कागदपत्रांच्या पाच प्रती तात्काळ शासनास सादर कराव्यात.

२. सदर प्रक्रिये दरम्यान विहित कायदेशीर कालमर्यादेचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता सर्व संबंधित प्राधिकरणांनी घ्यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९०९१८४९००६८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YAMUNA DHANANJAY JADHAV

Digitally signed by YAMUNA DHANANJAY JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=2C3DF382DDA9F94D60DC0EA9D4827D801C6EDC144E58FFD58ED3EF2FE7FB16A5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F6CCE4E8E68DFB65BCD1BA4CE35CF82E2B05A7DDC3056B9285E5C75F146B1EEA, cn=YAMUNA DHANANJAY JADHAV
Date: 2026.09.09 18:50:16 +05'30'

**(यमुना जाधव)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
४. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
५. पोलीस आयुक्त, मुंबई.
६. संचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस महानिरीक्षक.
१०.पोलीस आयुक्त (सर्व)
११.पोलीस अधीक्षक (सर्व)
१२.सचिव ,सल्लागार मंडळ तथा अवर सचिव/कक्ष अधिकारी, विशा-१०, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.निवडनस्ती /विशा-३(अ)